## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. ३६६/२०१०, ३६८/२०१०**

१. श्री भाऊ सचिदानंद नथ्थुजी लोखंडे - **तक्रारकर्ता**
संघर्ष, ५८, मोहगांव (झिल्पी)
तहसिल हिंगणा, जिल्हा नागपूर

२. जनमाहिती अधिकारी तथा सचिव - **गैरतक्रारदार**
ग्राम पंचायत मोहगांव झिल्पी,
तहसिल हिंगणा, जिल्हा नागपूर

**(आदेश पारित दिनांक २३/०२/२०११)**

**निर्णय**

१. तक्रारकदार यांनी दि. २०/१२/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०२/०२/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २३/०२/२०११ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर व गैरतक्रारदार हजर आहेत.

२. तक्रारदार यांचे आयोगाकडील अपील क्र. १२४३/२०१० व १३०५/२०१० मधील दि.२३/०९/२०१० रोजी दिलेल्या निर्णयातील आदेशाप्रमाणे जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत मोहगाव, यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून सदर दोन्ही अपीलांच्या संदर्भात आयोगाकडे तक्रार क्र.३६६/२०१० आणि ३६८/२०१० या दोन तक्रारी दाखल केल्या आहेत. सदर दोन्ही तक्रारींची सुनावणी आज आयोगापुढे एकत्रीत घेण्यात आली.

३. तक्रारदार यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांचे आयोगाकडील अपील क्र. १२४३/२०१० आणि १३०५/२०१० या दोन्ही अपीलांची सुनावणी दि. २३/०९/२०१० रोजी आयोगापुढे एकत्रीत घेण्यात आली. त्यात आदेश क्र.१ मध्ये जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, मोहगांव झिल्पी यांचेकडे अपीलकर्ता यांनी कामकाजाचे दिवशी तारीख व वेळ लेखी कळवून उपस्थित होऊन संबंधित अभिलेखांचे निरिक्षण करावे तसेच दि.१८/०५/२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना कागदपत्रांचे स्वरुपात माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आयोगाचे आदेश असतांना देखील तब्बल २४ दिवस जास्त होऊनही सचिव, ग्रामपंचायत हिंगणा यांचेकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी तक्रारदार यांनी आयोगाकडे केलेली आहे.

४. जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत मोहगाव झिल्पी ता. हिंगणा हे हजर आहेत. त्यांनी सुनावणीत सांगितले की, आयोगाचे अपील क्र. १२४३/२०१० व अपील क्र. १३०५/२०१० मधील दि.२३/०९/२०१० चा निर्णय त्यांच्याकडे प्राप्त झाला. त्यानुसार तक्रारदार यांना माहिती देण्याकरिता तयार करण्यात आली आणि दि. ०९/०२/२०११ च्या पत्रान्वये यूपीसीद्वारे माहिती पाठविण्यात आली. अपीलकर्त्यास पाठविलेल्या माहितीच्या पत्राची पोच आयोगापुढे दाखविण्यात आली. परंतू सदरची माहिती तक्रारदार यांना मिळाली नाही असे तक्रारदारचे म्हणणे आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती आज आयोगासमोर तक्रारदार यांना देण्यात आली. परंतू तक्रारदार यांचे म्हणणे आहे की, सदर माहिती ही अपूर्ण आहे. म्हणून आयोगासमोर तक्रारदार आणि सचिव यांचे समक्ष असा निर्णय घेण्यात आला की, तक्रारदार यांना प्राप्त झालेल्या माहितीची त्यांनी खात्री करुन घ्यावी आणि जी माहिती अद्याप त्यांना मिळालेली नाही त्याबाबत तक्रारदार यांनी सचिव ग्राम पंचायत मोहगाव झिलपी हिंगणा यांचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी उपस्थित होऊन त्यांना पाहिजे असलेली माहिती प्रत्यक्ष प्राप्त करुन घ्यावी. तक्रारदार हे सचिव यांचेकडे आल्यानंतर त्यांना सचिव यांनी त्वरीत राहिलेली माहिती उपलब्ध

करुन द्यावी अन्यथा जनमाहिती अधिकारी यांचेवर शास्तीची कार्यवाही करण्यात येईल असे आयोगाने स्पष्ट केले म्हणून तक्रारदार यांची तक्रार ही अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत मोहगाव झिल्पी हिंगणा यांचेकडे तक्रारदार यांनी उपस्थित राहून त्यांना पाहिजे असलेली माहिती जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी.

तसेच जनमाहिती अधिकारी यांनी तक्रारदार त्यांचे कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर त्यांना पाहिजे असलेली संपूर्ण माहिती उपलब्ध करुन द्यावी अन्यथा त्यांचेविरुध्द शास्तीची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक...............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार**

**तक्रार क्र. ३६७/२०१०**

१. श्री भाऊ सचिदानंद नथ्थुजी लोखंडे - **तक्रारकर्ता**
संघर्ष, ५८, मोहगांव (झिल्पी)
तहसिल हिंगणा, जिल्हा नागपूर

२. जनमाहिती अधिकारी तथा सचिव - **गैरतक्रारदार**
तालुका निरिक्षक
भुमि अभिलेख कार्यालय हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर

**(आदेश पारित दिनांक २३/०२/२०११)**

**निर्णय**

१. तक्रारकदार यांनी दि. २०/१२/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०२/०२/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २३/०२/२०११ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर व गैरतक्रारदार हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी त्यांची आयोगाकडील तक्रार क्र. २९९/२०१० मधील दि.२९/१०/२०१० च्या आदेशाप्रमाणे तालुका निरिक्षक भुमि अभिलेख तथा जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

३. तक्रारदार हे स्वतः हजर असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी आयोगाकडे जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक भुमी अभिलेख हिंगणा जिल्हा नागपूर यांचेविरुध्द दि.०६/०९/२०१० रोजी तक्रार दाखल केली होती. त्या तक्रारीच्या संदर्भात दि. २९/१०/२०१० रोजी आयोगाकडून आदेश पारित करण्यात आले की, जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक भूमि अभिलेख हिंगणा यांनी तक्रारदार हे बी.पी.एल. प्रमाणपत्रधारक असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७ (५) प्रमाणे त्यांना हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. परंतू जनमाहिती अधिकारी यांनी सदर आदेशावर कोणतीही कार्यवाही केली नाही. म्हणून तक्रारदार यांना आयोगाकडे पुन्हा तक्रार दाखल करावी लागली आहे.

४. आजच्या सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक भुमि अभिलेख हिंगणा श्री ए. एस. वाडेकर हे हजर असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांच्या कार्यालयाकडे तक्रार क्र. २९९/२०१० मधील दि. २९/१०/२०१० चे आदेश त्यांच्या कार्यालयाकडे दि.०१/१२/२०१० रोजी प्राप्त झाले आहे. त्याला अनुसरुन तक्रारदार यांना दि.१५/१२/२०१० च्या पत्रान्वये माहिती पाठविलेली आहे. सदर माहिती तक्रारदार यांना प्राप्त झाली मात्र ती अपूर्ण असल्याचे तक्रारदार यांनी सांगितले. म्हणून तक्रारदार यांना पुन्हा दि. ११/०१/२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

५. तक्रारदार व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले असता प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक भूमि अभिलेख यांनी तक्रारदार यांना दि.१५/१२/२०१० च्या आणि दि. ०१/११/२०११ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे म्हणजेच दोनवेळी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणून भविष्यात जनमाहिती अधिकारी यांना कोणत्याही तक्रारीच्या संदर्भात तक्रारदार यांनी एकाचवेळी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी समज देण्यात येत

आहे. तथापी सदर माहिती संदर्भात तक्रारदार यांना जनमहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

२. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार**

**तक्रार क्र. ३८१/२०१०**

१. श्री दिवाकर रामभाऊ कोरेवार - **तक्रारकर्ता**
मु. कोटगल पो. पारडी
ता. जि. गडचिरोली

२. जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक - **गैरतक्रारदार**
वनसंरक्षक कार्यालय, गडचिरोली वनवृत्त, गडचिरोली
ता. जि. गडचिरोली.

**(आदेश पारित दिनांक २५/०२/२०११)**
**निर्णय**

१. तक्रारकदार यांनी दि. २१/१२/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०७/०२/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २५/०२/२०११ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार गैरहजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी त्यांचे आयोगाकडील अपील क्र. ९३९/२०१० मधील दि. ०२/०८/२०१० च्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि.०५/०४/२०१० रोजी आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

३. तक्रारदार हे आज सुनावणीस गैरहजर असून त्यांच्या लेखी निवेदनावरुन असे दिसून येते की, त्यांनी जनमाहिती अधिकारी यांचेविरुध्द आयोगाकडे दि. ०१/०७/२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले होते. सदर द्वितीय अपीलाची सुनावणी दि.०२/०८/२०१० रोजी घेण्यात आली आणि जनमाहिती अधिकारी यांना आदेश देण्यात आले की, अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जानुसार दि.३१/१२/२००० रोजी तीन पदावर

कोण कार्यरत होते याबाबत अपीलार्थीस १० दिवसांचे आत माहिती देण्यात यावी. परंतू सदर आदेशाची अमंजबजावणी झाली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशाप्रमाणे जी माहिती दिलेली आहे ती दिशाभूल करणारी आहे कारण संबंधित माहिती न देता जनमाहिती अधिकारी यांनी १९८९ मध्ये पदोन्नती दिलेल्या कर्मचाऱ्यांची त्यांना माहिती दिलेली आहे असे सदर निवेदनात नमूद केलेले दिसून येते.

३. आजच्या सुनावणीस गैरतक्रारदार जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, गडचिरोली वनवृत्त कार्यालय गडचिरोली हे उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, आयोगाकडील अपील क्र. ९३९/२०१० मधील दि. ०२/०८/२०१० च्या निर्णयातील आयोगाच्या आदेशाप्रमाणे तक्रारदार यांना दि.०४/१२/२०१० च्या पत्रान्वये माहिती पाठविण्यात आलेली आहे व सदर पत्रात दि.३१/१२/२००० रोजी ३ पदावर कोण कार्यरत होते याची माहिती सुध्दा नमूद करुन दिलेली आहे. सदरच्या पत्राची तक्रारदार यांची पोच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे दाखविली. त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

२. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक...............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार**

**तक्रार क्र. ३८०/२०१०**

१. श्री भास्कर तुळशिराम वाढई, - **तक्रारकर्ता**
गंगाबाई घाट रोड, जुनी मंगळवारी,
नागपूर.

**वि रु ध्द**

२. जनमाहिती अधिकारी तथा - **गैरतक्रारदार**
उपविभागीय वन अधिकारी, वन विभाग,
शासकीय मुद्रणालय जवळ,
सिव्हिल लाईन्स, नागपूर.

**(आदेश पारित दिनांक २५/०२/२०११)**

**निर्णय**

१. तक्रारकदार यांनी दि. २३/१२/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०७/०२/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २५/०२/२०११ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार गैरहजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी त्यांचे आयोगाकडील अपील क्र. ९६७/२००९ मधील दि.१७/११/२००९ च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली म्हणून दि.२३/१२/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

३. तक्रारदार हे आज आयोगापुढील सुनावणीस गैरहजर आहेत त्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. परंतू आयोगाकडे केलेल्या तक्रार अर्जावरुन असे दिसून येते की, त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपील क्र. ९६७/२००९ मधील दि. १७/११/२००९ च्या आदेशामध्ये जनमाहिती अधिकारी यांना तक्रारदार यांच्या १० प्रवास भत्ता बिलांच्या बाबत शोध घेवून त्याची माहिती तक्रारदारास उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले होते. परंतू त्यांना ८ प्रवास भत्ता बिले पारित केल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी कळविले व २ बिलांची माहिती उपलब्ध झाल्यावर देण्यात येईल, परंतू त्यातील ३ बीले ही त्यांची नाहीत असे तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात नमूद केले आहे.

४. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी हे आज आयोगापुढे हजर असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, तक्रारदार यांना दि.१५/०२/२०१० च्या पत्रान्वये १० प्रवासभत्ता बिलांपैकी ८ प्रवासभत्ता बिलांची माहिती त्यांना देण्यात आली आहे. व दोन प्रवासभत्ता बिलाबाबत सबंधितांकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर कळविण्यात येईल असे तक्रारदार यांना लेखी कळविलेले आह. तक्रारदार यांच्या प्रवासभत्ता देयकांबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी दक्षिण उमरेड यांना दि. १५/०२/२०१० आणि दि.१२/०३/२०१० च्या पत्रान्वये माहिती देणे बाबत कळविलेले आहे. त्यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर तक्रारदार यांना माहिती पुरविण्यात येईल आणि सदरची बाब तक्रारदार यांना कळविली असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी दि. १५/०२/२०१० च्या पत्रान्वये तक्रारदारास १० पैकी ८ बिलांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे आणि दोन बिलांबाबत माहिती संबंधितांकडून प्राप्त झाल्यावर पुरविण्यात येईल असे देखील तक्रारदार यांना कळविण्यात आले आहे. म्हणून प्रस्तुत प्रकरणी आयोगाच्या

आदेशाप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी तक्रारदारास माहिती उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही केलेली असल्यामुळे तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

२. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक...............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार**

**<u>तक्रार क्र. ३७९/२०१०</u>**

१. श्री दिपक महेंद्र पांडेय, - **तक्रारकर्ता**
चुडी मोहल्ला, वार्ड नं.१०,
ता. देवळी, जि. वर्धा.

२. जनमाहिती अधिकारी तथा कर अधिक्षक, - **गैरतक्रारदार**
(मालमत्ता कर विभाग)
नगर परिषद पुलगांव,
ता. देवळी, जि. वर्धा.

**(आदेश पारित दिनांक २५/०२/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. तक्रारकदार यांनी दि. ०३/१२/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०७/०२/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २५/०२/२०११ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर व गैरतक्रारदार हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी त्यांचे आयोगाकडील अपील क्र. ८९३/२०१० व अपील क्र.८९४/२०१० मधील दि.१९/०७/२०१० च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी अर्धवट माहिती दिल्यामुळे व पूर्ण माहिती अद्यापपर्यंत प्राप्त झाली नाही म्हणून दि.०३/१२/२०१० रोजी आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

३. तक्रारदार यांनी आयोगापुढे सांगितले की, जनमाहिती अधिकारी तथा कर अधिक्षक नगर परिषद, पुलगांव ता. देवळी जि. वर्धा यांचेकडे दि. २९/०१/२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखालील अर्जान्वये सन १९८७ साली श्रीमती हिराबाई वि. ब्रम्हप्रसाद तिवारी यांच्या मालमत्तेबाबत व वार्ड क्रमांकात वारंवार होणाऱ्या बदलाबाबत माहिती मागितली होती. परंतू जनमाहिती अधिकारी यांचेकडून अपेक्षित माहिती न मिळाल्यामुळे व प्रथम अपीलानंतरही समाधानकारक माहिती न मिळाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे दि.२२/०६/२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले होते. सदर द्वितीय अपीलाची सुनावणी घेण्यात येऊन दि.१९/०७/२०१० रोजी आदेश पारित करण्यात आले. त्या आदेशात जनमाहिती अधिकारी यांना अपील क्र.८९३/२०१० मध्ये १० दिवसांचे आत अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश देण्यात आले. व अपील क्र. ८९४/२०१० मध्ये नायब तहसिलदार सोबत अभिलेखागाराचे निरिक्षण देण्यात यावे व निरिक्षणाअंती सदरची नस्ती उपलब्ध असल्यास त्यातून आवश्यक माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन देण्याचे स्पष्ट आदेश असतांनाही जनमाहिती अधिकारी यांनी अर्धवट माहिती उपलब्ध करुन दिलेली असून माहितीसाठी रु.५०/- चे शुल्क घेतले आहे. तसेच जनमाहिती अधिकारी यांचेकडे एकूण ४ प्लॉटची माहिती मागितली होती परंतू त्यापैकी ३ प्लॉटची माहिती तक्रारदार यांना मिळालेली आहे. मात्र वार्ड नं.१२ मधील मालमत्ता क्र.१५ ची माहिती त्यांना अद्यापही मिळालेली नाही असे तक्रारदार यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा कर अधिक्षक, मालमत्ता कर विभाग नगर परिषद पुलगाव श्री दिलीप लांडगे हे उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, आयोगाच्या दि.१९/०७/२०१० च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे तक्रारदार यांना दि.१२/१०/२०१० च्या पत्रान्वये ४ मालमत्तेपैकी ३ मालमत्तेची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याचप्रमाणे वार्ड क्र.१२ मधील मालमत्ता क्र.१५ ही हिराबाई ब्रम्हप्रसाद तिवारी यांचे नावाने नाही असेही तक्रारदारास कळविलेले आहे.

५. प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार यांना पाहिजे असलेल्या ४ ही मालमत्तेची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी तक्रारदारास उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते. आणि वार्ड क्र.१२ मधील मालमत्ता क्र.१५ ही मालमत्ता श्रीमती हिराबाई ब्रम्हप्रसाद तिवारी यांचे नावावर नाही याबाबतही तक्रारदारास पुरावा म्हणून मालमत्तेची नोंद केलेल्या नावांचे रजिस्टर आयोगापुढे जनमाहिती अधिकारी यांनी दाखविले, याबाबत तक्रारदार यांची खात्री झाली. आयोगाच्या आदेशाप्रमाणे तक्रारदार यांना माहिती उपलब्ध झाल्यामुळे तक्रारदार यांची तक्रार ही खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

२. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक...............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**